# विनियम क्र. ५/२०२०

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठास दानदात्यांकडून भूखंड/इमारत देणगी स्वरूपात स्वीकारण्याबाबतचे विनियम - २०२०

ज्या अर्थी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठास इमारत देणगी स्वरूपात प्राप्त झाली,

आणि

ज्या अर्थी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये दानदात्यांकडून एखादे भूखंड / इमारत देणगी स्वरूपात स्वीकारण्याबाबतचे नियम अस्तित्वात नाही,

आणि

ज्याअर्थी, व्यवस्थापन परिषदेने दि.१३.१२.२०१८ रोजी बाब क्र.१७४ अन्वये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये दानदात्यांकडून एखादे भूखंड/इमारत देणगी स्वरूपात स्वीकारण्याबाबतची नियमावली तयार करण्याचे निर्देश दिले,

आणि

ज्या अर्थी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठास भूखंड/इमारत देणगी स्वरूपात प्राप्त होईल.

त्या अर्थी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठास दानदात्यांकडून भूखंड/ इमारत देणगी स्वरूपात स्वीकारण्यासंदर्भात खालीलप्रमाणे विनियम विहित करण्यात येत आहे;

अ) या विनियमास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठास दानदात्यांकडून भूखंड/इमारत देणगी स्वरूपात स्वीकारण्याबाबतचे विनियम क्र. ५/२०२० असे संबोधण्यात यावे.

ब) हा विनियम व्यवस्थापन परिषदेने मंजूर केलेल्या दिनांकापासून म्हणजेच दि.२८.११.२०२० पासून अस्तित्वात येईल.

क) **व्याख्या-** या विनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

१) "विद्यापीठ" म्हणजे अमरावती विद्यापीठ कायदा, १९८३ (महाराष्ट कायदा क्र. XXXVII,1983) अन्वये स्थापन झालेले संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

२) "दानदाते" म्हणजे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठास भूखंड/इमारत देणगी स्वरूपात देणारी व्यक्ती, संस्था, आस्थापना इ.

३) "भूखंड" म्हणजे वापरण्यायोग्य प्रत्यक्ष असलेला जमिनीचा तुकडा.

४) "इमारत" म्हणजे भूखंडावर प्रत्यक्ष अस्तित्वात असलेली पुर्ण/अपुर्ण बांधकाम.

५) "देणगी" म्हणजे दानदात्याकडून त्याच्या कायदेशीर मालकीची स्वेच्छेने व विनामुल्य देण्यात आलेली इमारत/भुखंड.

ड) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठास दानदात्यांकडून भूखंड /इमारत देणगी स्वरूपात स्वीकारण्याबाबत खालीलप्रमाणे नियमावली विहित करण्यात येत आहेः

१) दानदात्याने संबंधित व आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नांवे विद्यापीठास सादर करावा.

२) दानदात्याकडून प्राप्त झालेला प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेपुढे तत्त्वतः मान्यतेसाठी सादर करण्याची जबाबदारी सामान्य प्रशासन विभागाची राहील.

३) दानदात्याकडून भूखंड/ इमारत देणगीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, प्रस्तावातील भूखंड/ इमारतीची पाहणी अभियांत्रिकी विभागाकडून करण्यात यावी व याबाबतचा अहवाल प्रशासन विभागाकडे सादर करण्यात यावा.

४) दानदात्याकडून मिळणारे भूखंड/ इमारत कोणत्याही कायदेशीर वादविवादात अडकलेला नसावा व त्यावर कोणताही कर्ज/गहाण बोजा नसावा. यासंबंधात वर्तमानपत्रात जाहिरात व इतर कायदेशीर मार्गाचा अवलंब करून खातरजमा करण्याची कार्यवाही विधी विभागाने करावी.

५) सदर भूखंड/ इमारतीचा सर्च रिपोर्ट विधी विभागामार्फत प्राप्त करण्यात यावा व त्याबाबतचा अहवाल प्रशासन विभागाकडे सादर करण्यात यावा.

६) दानदात्याकडून भूखंड /इमारत देणगी स्वरूपात प्राप्त झाल्यानंतर त्यावर सदर दानदात्याचा अथवा त्यांच्या वारसदारांचा कोणताही उजर/मागणी राहणार नाही. याबाबत बक्षीसपत्रामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

७) दानदात्याने विद्यापीठास भूखंड/इमारत देणगी स्वरूपात देत असतांना त्यांच्या काही मागणी/अटी/शर्ती सादर केल्यास सदर मागणी/अटी/शर्तींचा बक्षीसपत्रामध्ये समावेश करून प्रारूप बक्षीसपत्र तयार करण्यात यावे.

८) व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी भूखंड/ इमारत बाबतचे प्रारूप बक्षीसपत्र तयार करण्याची कार्यवाही अभियांत्रिकी आणि विधी विभागामार्फत करण्यात येईल.

९) दानदात्याकडून भूखंड/ इमारत देणगी स्वरूपात स्वीकारण्याबाबत प्रारूप बक्षीसपत्रासह व्यवस्थापन परिषदेसमोर विषय सादर करण्याची कार्यवाही प्रशासन विभागाने करावी.

१०) प्रारूप बक्षीसपत्र व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर रितसर नोंदणीकृत करण्याची कार्यवाही विधी विभागामार्फत करावी.

११) नोंदणीकृत बक्षीसपत्र प्राप्त झाल्यावर देणगीदाखल मिळालेला भूखंड/इमारती बाबतचे कायदेशीर कागदपत्रे प्राप्त करण्याची व सदर दस्तऐवज जतन करण्याची कार्यवाही अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात यावी.

१२) दानदात्याकडून भूखंड/ इमारत बक्षीसपत्र करून स्वीकारल्यानंतर त्याचा वापर व्यवस्थापन परिषदेच्या निर्देशानुसार करण्यात यावा.

१३) दानदात्याने किंवा त्याच्या वारसदाराने अथवा कोणीही बक्षीसपत्रात नमूद असलेल्या अटी व शर्ती शिवाय भविष्यात इतर कोणतीही मागणी केल्यास ती स्वीकारण्यात येणार नाही.

१४) दानदात्याकडून भूखंड/इमारत देणगी स्वरूपात स्वीकारण्यासंदर्भात बक्षीसपत्र व इतर आनुषंगिक दस्तऐवजांकरीता होणाऱ्या खर्चाकरीता नवीन अर्थशीर्ष निर्माण करण्याची कार्यवाही वित्त विभागामार्फत करण्यात यावी.